# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०१७
## (सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सन २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि सन २०१०-२०११ व २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

तीन : अंदाज समितीचा दुसरा अहवाल सादर करणे.

चार : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

*सहा : शासकीय विधेयक :*

*पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-*

***सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१७.***

*सात : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :*

*(दिनांक १५ मार्च, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्र.१ ते ३)*

*(१) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, अमीन पटेल, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. राहुल बोंद्रे, हर्षवर्धन सपकाळ, श्रीमती निर्मला गावित, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. नितेश राणे, शरद सोनावणे, कालीदास कोळंबकर, सरदार तारासिंह, किसन कथोरे, संदीप नाईक, जितेंद्र आव्हाड, बळीराम सिरसकर, संजय केळकर, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, मो.आरिफ (नसीम) खान, अब्दुल सत्तार, शेख आसिफ शेख रशीद, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. पतंगराव कदम, श्री. संग्राम थोपटे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. वैभव पिचड, सुनिल प्रभु, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. हसन मुश्रीफ, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, पांडुरंग बरोरा, सुनिल शिंदे, राजन साळवी, संदीपानराव भुमरे, बाळासाहेब मुरकुटे, दत्तात्रय भरणे, राणाजगजीतसिंह पाटील, विनायकराव जाधव-पाटील, ॲड. भीमराव धोंडे, ॲड. राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"अहमदनगर जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या कॅन्टीनमध्ये बनावट दारू निर्मितीचा व्यवसाय सुरु असल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास येणे, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या कॅन्टीनमधील बनावट दारु सेवन केल्यामुळे पांगरमल येथील दहा लोकांचा झालेला मृत्यु, सदर ठिकाणी पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात विविध कंपन्यांचे बुच, प्लास्टिक कव्हर, रिकाम्या बाटल्या, थिनर, चॉकलेटी फुड कलर असे बनावट दारु तयार करण्याचे साहित्य जप्त करणे, गत अनेक वर्षापासून जिल्हा रुग्णालयाच्या कॅन्टीनमध्ये वैद्यकीय अधिकारी व पोलिसांच्या संगनमताने सदर बनावट दारु तयार करण्याचा व्यवसाय सुरु असल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली भिती, परिणामी याची उच्चस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने*

*करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

(२) *डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. नितेश राणे, शरद सोनावणे, कालीदास कोळंबकर, सरदार तारासिंह, अमीन पटेल, राधाकृष्ण विखे-पाटील, पृथ्वीराज चव्हाण, अस्लम शेख, मो. आरिफ (नसीम) खान, प्रा. वर्षा गायकवाड, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, संग्राम थोपटे, डॉ. पतंगराव कदम, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. सुनिल केदार, विजय औटी, सुनिल प्रभु, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, हसन मुश्रीफ, राजन साळवी, संजय पोतनीस, अजय चौधरी, अजित पवार, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. वैभव पिचड, राणाजगजीतसिंह पाटील, अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"चेंबूर (मुंबई) येथील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणा-या संत एकनाथ मुलांच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या आहारात पाल सापडल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास येणे, वसतिगृहात पुरविण्यात येणा-या जेवणात यापूर्वीही काचेचे तुकडे व गोगलगाय आढळल्यामुळे वसतिगृहातील १५० विद्यार्थ्यांनी वसतिगृह अधीक्षकांकडे अन्न धान्याचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द तक्रारी करुनही संबंधितांनी कोणतीच दखल न घेणे, सामाजिक न्याय विभागाद्वारे कंत्राटदारांना आलटून पालटून कंत्राटे देण्यात येत असल्याचा गंभीर आरोप चेंबूर येथील विद्यार्थ्यांनी करणे, झुरळ, उंदराच्या लेंड्या, काचेचे तुकडे व खडे जेवणात सापडत असल्याने विद्यार्थ्यांनी शासनाकडे तक्रार करुनही कंत्राटदाराविरुध्द कोणतीच कारवाई न होणे, अजूनही वसतिगृहांना भेसळयुक्त अन्नधान्याचा पुरवठा होणे, परिणामी वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

(३) *सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, सुनिल केदार, अमित देशमुख, अब्दुल सत्तार, अमर काळे, मो.आरिफ (नसीम) खान, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती निर्मला गावित, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर, श्री.राहुल बोंद्रे, प्रा. विरेंद्र जगताप, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. जयंत पाटील, राजेश टोपे, शशिकांत शिंदे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. प्रदीप जाधव-नाईक, वैभव पिचड, डॉ. सतीश पाटील, श्री. सुनिल प्रभु, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. हनुमंत डोळस, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, पांडुरंग बरोरा, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे-पाटील, दत्तात्रय भरणे, ज्ञानराज चौगुले, ॲड. भीमराव धोंडे, सर्वश्री. राजन साळवी, राणाजगजीतसिंह पाटील, तान्हाजी मुटकुळे, अस्लम शेख, वि.स.स. तातडीच्या व*

*सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यात यंदा तुरीचे विक्रमी उत्पादन झाल्याने तुरीची आवक सुरु होताच बाजारपेठेत तुरीचे दर घसरण्याची झालेली सुरुवात, शेतक-यांना आधारभूत किंमतीनुसार भाव मिळावा यासाठी नाफेडच्या माध्यमातून सुरु केलेली तुरीची खरेदी, एकीकडे तुरीची आवक असतांना प्रशासनाने पुर्व तयारी म्हणून पोत्याची व्यवस्था न केल्याने थांबविण्यात आलेली खरेदी, खरेदी केंद्रावर पडलेले तुरीचे ढीग, शासनाने खरेदी केलेल्या तुरीच्या चुकाऱ्याची किंमत २२ कोटी ४५ लाख रुपये असून आतापर्यंत केवळ साडेआठ कोटीचे चुकारे अदा करण्यात येणे, तुरीचा हमीभाव ५ हजार ५० रुपये असतांना शेतकऱ्यांना ४ हजार १०० रुपये प्रति क्विंटल दराने तुर विकावी लागत असल्याने शेतकऱ्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान, तुरीची आवक वाढत असतांना शेतकऱ्यांना दोन-दोन दिवस खरेदी केंद्रावर थांबून सुध्दा शेतकऱ्यांकडून तुर खरेदी करण्याऐवजी खाजगी व्यापाऱ्यांकडून तुर खरेदी करण्यात येत असल्याचे दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास येणे, अद्यापही तूर संपूर्ण प्रमाणात विक्री झालेली नसल्यामुळे नाईलाजास्तव कमी दरात व्यापाऱ्यांना तुर विकण्याची शेतकऱ्यांवर आलेली वेळ व त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, त्यामुळे हमी भावानुसार शेतकऱ्यांकडून तूर खरेदी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*आठ : सर्वश्री. अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. संदीप नाईक, सुनिल केदार, मकरंद पाटील, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश पाटील, मो.आरिफ नसीम खान, सर्वश्री. सुरेश लाड, अमित देशमुख, दिलीप सोपल, डी. एस. अहिरे, राणा जगजितसिंह पाटील, ॲड.यशोमती ठाकूर, सर्वश्री. बबनराव शिंदे, मधुकरराव चव्हाण, राहुल मोटे, डी.पी.सावंत, हसन मुश्रीफ, कालिदास कोळंबकर, शिवेंद्रसिंह भोसले, बसवराज पाटील, राजेश टोपे, वसंतराव चव्हाण, दत्तात्रय भरणे, अमिन पटेल, बाळासाहेब पाटील, के.सी. पाडवी, कुणाल पाटील, संग्राम जगताप, काशिराम पावरा, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, हनुमंत डोळस, राहुल बोंद्रे, अवधुत तटकरे, नितेश राणे, विजय भांबळे, वैभव पिचड, अमर काळे, पांडुरंग बरोरा, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री. शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, श्री. अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भारत*

*भालके, जयकुमार गोरे, संजय कदम, नरहरी झिरवाळ, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :*

*राज्यात झपाटयाने वाढत असलेले शहरीकरण, परिणामी रस्ते, सांडपाणी, घनकचरा व पाणी पुरवठा इ. सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यास महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती यांच्यावर पडत असलेला ताण, १० हजारपेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या ग्रामपंचायतींना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी नगरोत्थानाची योजना राबविण्यात यावी अशी होत असलेली मागणी, औरंगाबाद जिल्हयात २२ टक्के ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय नसणे, सुमारे १९२ ग्रामपंचायती या खाजगी जागेत किंवा भाडयाच्या जागेत कार्यरत असणे, या व अन्य ग्रामपंचायतीच्या इमारतीचा प्रश्न मार्गी लावण्याची नितांत आवश्यकता, आतापासूनच ठाणे जिल्हयात तीव्र पाणी टंचाई निर्माण झालेली असणे, पालघर जिल्हयात दोन वर्षात एकही विहिर बांधण्यात आलेली नसणे, मराठवाडयात पाणी साठे झपाटयाने कमी होत असणे, संपूर्ण राज्यात पाणी टंचाई तीव्र होण्याची निर्माण झालेली भिती, यावर शासनाने तातडीने उपाययोजना करुन व टँकरने व रेल्वेने पाणीपुरवठा करण्याबाबत आतापासूनच उपाययोजना करण्याची आवश्यकता, मुंबईतील चार लाख झोपडपट्टीवासियांना झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत स्वत:च्या मालकीची घरे देण्याची घोषणा शासनाने करणे, परंतु अद्यापही घराचे वाटप करण्यात आलेले नसणे, महानगरपालिका व एमएमआरडीए हद्दीतील ८६ हजार ४२९ एसआरए योजनेंतर्गत असलेल्या घरांचे सर्वेक्षण करण्यात येणे, या सर्वेक्षणात १२ हजार ४६० मुळ लाभार्थी राहत नसल्याचे उघड होणे, त्यांच्याविरुद्ध कारवाई करुन त्यांना निष्कासित करण्याची आवश्यकता, मुंबईतील एसआरए योजनेखाली बांधण्यात आलेल्या इमारती व ३५ हजार सदनिकांना अद्यापही भोगवटा प्रमाणपत्र देण्यात न येणे, भोगवटा प्रमाणपत्र न देण्याची कारणे स्पष्ट करण्यात न येणे, या सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने त्वरीत उपाययोजना करण्याची आवश्यकता, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा केवळ वाढीव चटईक्षेत्र मिळविण्यासाठी विकासक वापर करुन घेत असणे, मुंबईतील खार जिमखान्याजवळ असलेल्या मोरदानी सिग्नेचर या साडेपाचशे चौरस मिटर जागेवर २० मजली टॉवर विकासकाने बांधणे, प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या १७ सदनिका, बालवाडी, कल्याणकेंद्र इत्यादीसाठी राखीव असलेल्या चटईक्षेत्र डयुप्लेक्स सदनिका उभारण्यासाठी या कंपनीने वापरल्याचे स्पष्ट होणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (१४) ड नुसार महानगरपालिकेकडून परवाने मिळवून केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची व संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, मुंबईतील ५० टक्क्याहून अधिक खासगी म्हाडा वसाहती, चाळी व इत्यादी इमारतींना पुनर्विकासाशिवाय पर्याय नसणे, तथापि, या*

*संबंधातील केंद्र शासनाच्या कायद्यात पुनर्विकासाच्या मुद्दयाला संदिग्ध स्थान देण्यात येणे, या कायदयाला अनुसरुन राज्य शासनाने केलेल्या नियमांच्या मसुद्यातही पुनर्विकासातील रहिवाशांच्या तोंडाला पाने पुसण्यात येणे, या सर्व प्रकरणाची चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची व कायदयात बदल करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.*

*नऊ : शासकीय विधेयके :*

*विचार, खंडश: विचार व संमत करणे :-*

*(१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, संजय कदम, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. दिपक चव्हाण, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, संदिप नाईक, अबू आझमी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, सुरेश लाड, पांडुरंग बरोरा, जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ — मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."*

*(ख) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४ — मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा*

*अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.*"

*(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४ — मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.*"

---

*(२) (क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.*"

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.*"

*(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र*

*शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

---

*(३) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, संजय कदम, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. दिपक चव्हाण, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, संदिप नाईक, अबू आझमी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, सुरेश लाड, पांडुरंग बरोरा, जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ — महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."*

*(ख) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७ — महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७ — महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन*

*विचारार्थ पाठविण्यात यावे."*

दहा : *अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-*

*(बुधवार, दिनांक १५ मार्च, २०१७ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. १ व २)*

*(१) डॉ.देवराव होळी, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.*

*"गडचिरोली जिल्हा हा ७०% वन व्याप्त जिल्हा असून जंगलामध्ये, तेंदू, बांबू, मोहफुल, हिरडा, बेहळा, आवळा, इत्यादी प्रकारचे गौण वनोपज मोठ्या प्रमाणावर असणे, या जिल्ह्यात एकही मोठा उद्योग निर्माण न झाल्याने येथे गौण वनोपजावर आधारित उद्योग निर्माण झाल्यास स्थानिक आदिवासी, गैर आदिवासी व तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे, येथील वनात मोठया प्रमाणावर वनौषधी असूनही त्या आधारित उद्योग नसणे, सबब गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी गौण वनोपजावर आधारित उद्योग निर्माण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(२) श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.*

*"सिन्नर तालुक्यातील गोदावरी उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्यादित बारागाव पिंप्री, पाटपिंप्री, सुळेवाडी योजना सन १९८३ साली स्थापन होणे, सदर योजना ३ वर्षात पूर्ण होणे अपेक्षित असताना वितरण व्यवस्थेची कामे अद्यापही अपूर्ण असल्याने उक्त तीनही गावांतील शेतीला एकदाही पाणी पुरवठा न होणे, योजना प्रलंबित राहिल्याने शेतकऱ्यांवरील कर्ज ९ कोटी रुपयांवरून ३७ कोटी रुपयांवर पोहोचणे, सदर कर्जामुळे नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक देखील अडचणीत येणे, सन २००९ साली विभागीय कार्यालय, नाशिक येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जळगाव जिल्ह्यातील २१ आणि धुळे जिल्ह्यातील ३५ संस्थांना कर्जमाफी देणे, तथापि, नाशिक जिल्ह्यातील खास करून सिन्नर तालुक्यातील उक्त योजनेस शेतकऱ्यांची मागणी असून देखील कर्जमाफी न मिळणे, शेतकऱ्यांना एकदाही पाणी पुरवठा न झाल्याने तसेच थकीत कर्ज दिवसागणिक वाढत असल्याने बाधित शेतकऱ्यांचे होणारे हाल, त्रास व आत्महत्या टाळण्यासाठी या संपूर्ण कर्जाला कर्ज माफी देण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*(३) श्री.भास्कर जाधव, वि.स.स.*

*"खेड, दापोली, मंडणगड व चिपळूण (जि.रत्नागिरी) या चार तालुक्यांना जोडणाऱ्या वाशिष्ठ खाडीवर पूल बांधण्याबाबत" या विषयावरील*

*श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७३८३६ ला दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.*

*(४) श्री. राहूल कुल, वि.स.स.*

*"पुणे महानगरपालिकेच्यावतीने पाणी शुध्द करुन कालव्यात सोडण्याबाबत" या विषयावरील श्री.बाबुराव पाचर्णे, वि.स.स. यांचा दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्र. २४७ मधील प्रश्न क्रमांक ४२८४५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.*

*विधान भवन,*
*मुंबई,*
*दिनांक : १५ मार्च, २०१७*

*डॉ. अनंत कळसे,*
*प्रधान सचिव,*
*महाराष्ट्र विधानसभा.*